नि. दि. दावा क. २०९/२०१७
CNR:**MHWRO2000848 2017**

**निशाणी क. १७ वरील आदेश**

वादीने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ८० प्रमाणे असणारी नोटीस माफ करण्याबाबत दाखल केला आहे.

वादीचे अर्जातील कथन थोडक्यात असे :-

२. वादीने प्रस्तुतचा दावा विशिष्ट कराराची पुर्तता करून मिळणेबाबत तसेच निरंतर मनाई आदेश मिळणेबाबत दाखल केला आहे. सदरचा दावा हा नि. क. ५ वरील सुनावणीसाठी प्रलंबित आहे. प्रतिवादी क. १ यांनी कैफियतीसोबत काही प्राथमिक हरकती उपस्थित केल्या आहेत. सदर हरकती अनुसार वादीने आवश्यक पक्षकार सामील करण्याबाबत अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये शासनाला सामील करून घेतले आहे त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ८० प्रमाणे नोटीस देणे गरजेचे आहे, परंतु वादीने शासनाविरूध्द कोणतीही मागणी केली नसल्यामुळे सदरची नोटीस माफ करण्यात यावी अशी विनंती वादीने केली आहे.

३. वादीचे सदर अर्जास प्रतिवादी क. १ याने नि.क. १९ वर म्हणणे दाखल करून सक्त हरकत नोंदविली आहे. प्रतिवादी क. १ त्याचे म्हणणेमध्ये असे कथन करतो की, जरी वादीने शासनाविरूध्द कोणतीही मागणी केली नाही तरी परंतु शासन हे आवश्यक पक्षकार असल्याने वादीने त्यांना कलम ८० प्रमाणे नोटीस देणे गरजेचे आहे. वादीने प्रतिवादी क. २ विरूध्द मागणी केलेली आहे. प्रतिवादी क. २ हे शासनाच्या अंतर्गत काम करणारे दुय्यम अधिकारी आहे. सबब सदरचा अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती प्रतिवादीने केली आहे.

४. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला व दाखल कागदपत्र पडताळून पाहिले असता असे दिसून येते की, वादीने सदरचा दावा विशिष्ट कराराची पुर्तता करून मिळणेबाबत, निरंतर व हुकूमात्मक मनाई आदेश मिळणेकरिता दाखल केला आहे. याकामी वादीने शासनाला पक्षकार म्हणून सामील केले आहे. प्रस्तुत प्रकरणातील नि.क. ५ चा अर्ज सुनावणीसाठी प्रलंबित आहे, तसेच वादीने

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHWR020008482017/truecopy/order-2.pdf

www.ecourtsindia.com



प्रतिवादी क्र. ३ शासन यांचे विरूध्द कोणतीही मागणी केलेली नाही. त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ८०(२) प्रमाणे नोटीस देणे बंधनकारक नाही. सदर प्रकरणामध्ये नि.क्र. ५ चा अर्ज प्रलंबित असल्यामुळे तातडीची निकड दिसून येते. सबब वरील सर्व कारणास्तव वादीचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे. त्याबाबतचा सविस्तर आदेश मी खालील प्रमाणे पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. सदरचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

Digitally signed by Sangita Pundlik Babar
Date: 2020.02.28 11:14:25 +0530

(श्रीमती एस.पी.बाबर)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
वर्धा.

दिनांक :- २७/०२/२०२०

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHWR020008482017/truecopy/order-2.pdf